दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# महाराष्ट्र विधानसभेसाठी भाजपची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

## नागपूर दक्षिण-पश्चिममधून देवेंद्र फडवणीस आणि कामठीमधून चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर दक्षिण । प्रतिनिधी**
पश्चिममधून देवेंद्र फडवणीस आणि कामठीमधून चंद्रशेखर बावनकुळे हे पहिल्या यादीत आहेत.
भाजपच्या पहिल्या यादीत १३ महिला उमेदवारांची नावं आहेत. यात मुंबईतील गोरेगावमधून माजी मंत्री विद्या ठाकूर यांचंही नाव आहे.
पहिल्या यादीत मुंबईचे १४ उमेदवार जाहीर
पुण्यातील कसबा मतदारसंघातून अद्याप उमेदवार जाहीर करण्यात आला नाहीय. इथे भाजपच्या मुक्ता टिळक आमदार होत्या. त्यांच्या निधनानंतर पोटनिवडणूक झाली आणि त्यात काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांनी भाजपच्या हेमंत रासनेंचा पराभव केला होता. या जागेवर भाजपनं पहिल्या यादीत तरी उमेदवार दिला नाहीय.
तसंच, पुण्यातीलच वडगाव शेरीमधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे सुनील टिंगरे विद्यमान आमदार आहेत. इथे भाजपचे जगदिश मुळीक इच्छूक आहेत. या जागेवरही भाजपनं पहिल्या यादीत कुणीच उमेदवार दिला नाहीय.
खडकवासल्यात भीमराव तापकीर हे भाजपचे विद्यमान आमदार आहेत. मात्र, पहिल्या यादीत त्यांचे नाव नाहीय.
मुंबईतील १४ उमेदवार भाजपनं जाहीर केले आहेत, मात्र वर्सोवा, घाटकोपर पूर्व आणि बोरिवली या दोन मतदारसंघातील उमेदवार जाहीर केले नाहीत.
वर्सोव्यातून भारती लव्हेकर आणि बोरिवलीतून सुनील राणे हे दोघेही भाजपचे विद्यमान आमदार आहेत. तर घाटकोपर पूर्वमधून पराग शाह हे भाजपचे विद्यमान आमदार आहेत.

**अशोक चव्हाणांच्या मुलीला भोकरमधून उमेदवारी**
माजी मुख्यमंत्री आणि भाजपमध्ये जाऊन राज्यसभा खासदार बनलेल्या अशोक चव्हाण यांच्या मुलीला भाजपनं पहिल्या यादीत स्थान दिलंय. अशोक चव्हाणांची कन्या श्रीजया चव्हाण यांना नांदेडमधील भोकर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केलीय.
तर कालच शरद पवार यांची भेट घेतलेल्या गणेश नाईक यांना नवी मुंबईतील ऐरोलीतून उमेदवारी देण्यात आलीय.काही दिवसांपूर्वी कल्याणमध्ये शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार करणाऱ्या विद्यमान आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नीला म्हणजे सुलभा गायकवाड यांना भाजपनं उमेदवारी दिलीय.

**बच्चू कडूंविरोधात भाजपनं दिला उमेदवार**
विदर्भातल्या ६२ पैकी २३ जागांवर भाजपनं उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये विद्यमान आमदारांचं तिकीट कायम ठेवलेलं आहे. फक्त कामठीचे विद्यमान आमदार टेकचंद सावरकर यांचं तिकीट कापून त्याठिकाणी चंद्रशेखर बावनकुळे यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. २०१९ ला बावनकुळेंचे तिकीट कापलं होतं.
अचलपूरमधून भाजपनं बच्चू कडूंविरोधात उमेदवार उतरवला आहे. प्रविण तायडे यांना उमेदवारी दिली आहे. प्रविण तायडे हे याआधी अमरावती जिल्हा परिषदेचे सदस्य होते.
गोंदियात विनोद अग्रवाल यांना भाजपनं उमेदवारी दिली आहे. २०१९ मध्ये त्यांनी तिकीट दिलं नाही म्हणून बंडखोरी केली होती. त्यांच्याऐवजी काँग्रेसमधून आलेल्या गोपालदास अग्रवाल यांना तिकीट दिलं होतं. यात विनोद अग्रवाल यांनी गोपालदास अग्रवाल यांचा पराभव केला होता. भाजपनं त्यावेळी विनोद अग्रवाल यांचं निलंबन केलं होतं. त्यानंतर गेल्या महिन्यात गोपालदास अग्रवाल यांनी काँग्रेसमध्ये घरवापसी केली आणि भाजपनं विनोद अग्रवाल यांचं निलंबन मागे घेतलं. आता त्यांचं नाव भाजपच्या पहिल्या यादीत आलं आहे.

**या' विद्यमान आमदारांना तिकीट नाही!**
नागपुरातील कामठी मतदारसंघातून भाजपचे टेकचंद सावरकर हे विद्यमान आमदार आहेत. मात्र, इथून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना तिकीट देण्यात आलं आहे. २०१९ साली याच मतदारसंघातून बावनकुळेंचं तिकीट कापण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर त्यांना विधान परिषदेवर पाठवण्यात आलं, तसंच भाजपचं प्रदेशाध्यक्षपदही देण्यात आलं होतं.
औरंगाबादमधील फुलंब्री मतदारसंघातून भाजपनं अनुराधा चव्हाण यांना उमेदवारी दिलीय. या मतदारसंघातील विद्यमान भाजप आमदार हरिभाऊ बागडे हे राजस्थानचे राज्यपाल म्हणून नियुक्त झाल्यानंतर ही जागा रिक्त होती.
कल्याण पूर्व मतदारसंघातील भाजप आमदार गणपत गायकवाड हे गोळीबार प्रकरणी तुरुंगात आहेत. त्यांच्या जागी त्यांच्या पत्नीला म्हणजे सुलभा गायकवाड यांना उमेदवारी दिलीय.
पुण्यातील चिंचवडमधून विद्यमान आमदार अश्विनी जगताप यांना तिकीट नाकारून, तिथे शंकर जगताप यांना तिकीट देण्यात आलीय. अश्विनी जगताप या पती लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर पोटनिवडणुकीत विजयी झाल्या होत्या.

## कोणा-कोणाला संधी,पाहा संपूर्ण यादी

| | | |
|---|---|---|
| चंद्रशेखर बावनकुळे- कामठी | विनोद अग्रवाल- गोंदिया | शंकर जगताप- चिंचवड |
| देवेंद्र फडणवीस- नागपूर दक्षिण पश्चिम | संजय पुरम- अमगाव | महेश लांडगे- भोसरी |
| राजेश पाडवी- शहादा | कृष्णा गजबे- आरमोरी | सिद्धार्थ शिरोळे- शिवाजीनगर |
| विजयकुमार गावीत- नंदुरबार | सुधीर मुनगंटीवार- बल्लारपूर | चंद्रकांत पाटील- कोथरूड |
| अनुप अग्रवाल- धुळे शहर | बंटी भांगडिया- चिमूर | माधुरी मिसाळ- पर्वती |
| जयकुमार रावल- सिंदखेडा | संजीवरेड्डी बोडकुरवार- वणी | राधाकृष्ण विखे पाटील- शिर्डी |
| काशीराम पावरा- शिरपुर | अशोक उडके- राळेगाव | मानिक राजले- शेवगाव |
| अमोल जावळे - रावेर | मदन येरवार- यवतमाळ | शिवाजीराव कर्डिले- राहुरी |
| संजय सावकारे- भुसावळ | भीमराव केरम- किनवट | प्रतिभा पाचपुते- श्रीगोंदा |
| सुरेश भोळे- जळगाव शहर | श्रीजया चव्हाण- भोकर | राम शिंदे- कर्जत जामखेड |
| मंगेश चव्हाण- चाळीसगाव | राजेश पवार-नायगाव | नमिता मुंदडा- केज |
| गिरीश महाजन- जामनेर | तुषार राठोड- मुखेड | संभाजी पाटील निलंगेकर- निलंगा |
| श्वेता महाले- चिखली | तानाजी मुटकुले-हिंगोली | अभिमन्यु पवार- औसा |
| आकाश फुंडकर- खामगाव | मेघना बोर्डीकर- जिंतूर | राणाजगतसिंह पाटील- तुळजापूर |
| संजय कुटे- जळगाव | बबनराव लोणीकर- परतूर | विजयकुमार देशमुख- सोलापूर शहर |
| रणधीर सावरकर- अकोला पूर्व | नारायण कुचे- बदनापूर | सचिन कल्याणशेट्टी - अक्कलकोट |
| प्रताद अडसद- धामणगाव रेल्वे | संतोष दानवे- भोकरदन | सुभाष देशमुख- सोलापूर दक्षिण |
| प्रवीण तायडे- अचलपूर | अनुराधा चव्हाण- फुलंब्री | जयुमार गोरे- माण |
| राजेश बकाणे- देवळी | अतुल सावे- संभाजीनगर पूर्व | अतुल भोसले- कराड दक्षिण |
| समीर कुणावार- हिंगणघाट | प्रशांत बंब- गंगापूर | शिवेंद्रराजे भोसले- सातारा |
| पंकज भोयर- वर्धा | दिलीप बोरसे- बागलाण | नितेश राणे- कणकवली |
| समीर मेघे- हिंगणा | राहुल आहेर- चांदवड | अमल महाडिक- कोल्हापूर दक्षिण |
| मोहन मते- नागपूर दक्षिण | राहुल ढिकले- नाशिक पूर्व | राहुल आवाडे- इचलकरंजी |
| कृष्णा खोपडे- नागपूर पूर्व | सीमा हिरे- नाशिक पश्चिम | सुरेश खाडे- मीरज |
| विजय रहांगडाले- तिरोरा | राहुल कुल- दौंड | सुधीर गाडगीळ- सांगली |

# राजेंद्र मस्केंची भारतीय जनता पार्टीला सोडचिठ्ठी

## लवकरच राजकीय निर्णय घेणार-राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**
भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र मस्के यांनी आज संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय बीड येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या साक्षीने भारतीय जनता पार्टीला सोडचिठ्ठी देऊन भाजप मुक्त होण्याचा निर्णय जाहीर केला आहे.
मा. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात विश्वास व्यक्त करून, भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाची दिलेली जबाबदारी अथक परिश्रम घेऊन प्रामाणिकपणे निभावली. पक्ष विचार, पक्षाचे कार्यक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहचून पक्ष विस्तारासाठी तन मन धनाने काम केले.
जिल्ह्याच्या कानाकोपऱ्या पर्यंत पक्षाचा कार्यक्रम व पक्षाचे नाव पोहोच केले. परंतु दुर्दैवाने भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाने कामाची दखल घेतली नाही. उलट दुजाभाव करत विरोधकावर मर्जी दाखवून कोठ्यावधीचा निधी देऊन, त्यांना बळ देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. राजकीय आणि विकास कामातही भाजपा पदाधिकाऱ्यांची दखल सत्ता असताना देखील घेतली गेली नाही.
लोकसभा निवडणुकीत लोकनेत्या पंकजाताई यांच्या विजयासाठी प्रतिकूल



सामाजिक परिस्थितीत यंत्रणा उभी केली. विजयासाठी कष्ठ घेतले. दुर्दैवाने पराभवानंतर व्यक्त केलेली शंका मनाला वेदना देणारी आहे. पराभवाचे खापर एकट्या मराठा समाजावर फोडून मोकळे झाले. मागील वर्षी बैलगाडा शर्यती दरम्यान प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या साक्षीने पंकजाताईंनी विधानसभेची उमेदवारी देण्याचे संकेत दिले. परंतु आज विधानसभा रणधुमाळी चालू असताना पक्षाने विचारपूस केली नाही. यावरून स्पष्ट येते की, भारतीय जनता पार्टीला राजकीय नकाशावर बीड जिल्ह्याची गरज उरलेली नाही. सर्व बळ आणि ताकत विरोधकांना देण्याचा संकल्प देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपाने घेतला आहे. जिह्यातील पक्ष हितासाठी प्राधान्य दिले गेले नाही. अशा नेतृत्वात काम करणे दुरापस्त आहे. म्हणून आज जिल्हाध्यक्ष पदासह भारतीय जनता पार्टीचा त्याग करत आहे. आगामी दोन तीन दिवसात योग्य तो राजकीय निर्णय घेतला जाईल.....

## राष्ट्रीय मजदुर कांग्रेस (इंटक)ची परळी तालुका कार्यकारिणी लवकरच जाहीर होणार - रामधन जमाल

**परळी । प्रतिनिधी**
राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक ची परळी तालुका कार्यकारिणी ची नव्याने पुनर्रचना करण्यात येणार असून राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.जी.संजिवा रेड्डी आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली असंघटित आणि संघटीत क्षेत्रातील कामगार चळवळ भक्कम आणि मजबूत करण्यासाठी तसेच कामगाराचे जीवन मान उंचावून त्यांना स्वाभिमानाने जीवन जगण्याचसाठी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक ची नव्याने पुनर्रचना करण्यात येणार आहेत तरी इच्छुक उमेदवारांनी लहुदास रोडे (९३७३०८२७४७) यांच्या शी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अध्यक्ष रामधन जमाले यांच्या वतीने करण्यात येत आहे आहे.
दरम्यान येत्या काळात असंघटित आणि संघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक डॉ जी संजिवा रेड्डी आणि डॉ कैलास भाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली मोठी चळवळ उभी करणार असून बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक ची नव्याने पुनर्रचना करण्यात येणार आहे म्हणून ज्यांना या कामगार चळवळीत काम करायचे आहे.अशा उमेदवाराने जिल्हा अध्यक्ष रामधन जमाले आणि लहुदास रोडे ९३७३०८२७४७ यांच्या संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अध्यक्ष रामधन जमाले यांच्या वतीने करण्यात येत आहे असे एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे.

# शिवसंग्रामच्या ज्योती मेटेंचा शरद पवार गटात प्रवेश

## राष्ट्रवादीकडून बीडमधून उमेदवारी मिळण्याची चर्चा

**मुंबई (वृत्तसंस्था)**
विधानसभा निवडणकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. सर्व राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात नेत्यांची इनकमिंग मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसत आहे. शिवसंग्रामच्या नेत्या तथा दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. सुप्रिया सुळे आणि शरद यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. त्यांना पक्षाकडून बीडमधून उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे.
मराठा आरक्षणाबाबत नेहमी आग्रही राहिलेले शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या ज्योती मेटे या पत्नी आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तीव्र आंदोलने झाल्याचे पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर शरद पवारांकडून मराठा आंदोलनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी सांगड घालण्यात येते असल्याचे बोलले जात आहे.
दरम्यान, ज्योती मेटे यांनी दोन दिवसांपूर्वी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली होती. ज्योती मेटे यांची लोकसभा निवडणूक देखील लढण्याची इच्छा होती. त्यासंदर्भात त्यांनी शरद पवार गटासोबत चर्चाही केली होती. मात्र, ऐनवेळी त्यांनी बीड लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली. व्यापक समाजहित लक्षात घेऊन बीड लोकसभेच्या मैदानातून माघार घेत आहोत, असे ज्योती मेटे यांनी त्यावेळी सांगितले होते.
विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात जोरदार इनकमिंग सुरू झाले आहे. भाजपचे हर्षवर्धन पाटील, अजित पवार गटाचे दीपक चव्हाण बबन तसेच फलटण येथील निंबाळकर गटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीत नुकताच प्रवेश केला आहे. तर माढ्याचे आमदार बबन शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवारांची भेट घेतली होती. त्यामुळे ते देखील तुतारी फुंकण्याच्या तयारीत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यात आता शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे यांनीही आज राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.
दरम्यान, लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे यश पाहता लोकांचा शरद पवारांवर विश्वास वाढला असे, पक्षाच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे.



# मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई येथे विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई येथील आजीवन शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाच्या वतीने दि. १८ व १९ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते कार्यशाळेचे उद्घाटन प्रा. राम भानुदास काटकर, सहाय्यक प्राध्यापक, राजर्षी शाहु अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई यांनी केले. यावेळी सायली निशिगंध या विद्यार्थीनीने संवाद कौशल्य या विषयावर आधारीत केलेल्या भित्तीपत्रीकेचे अनावरण करून उद्घाटन करण्यात आले. या दोन दिवशीय समन्वयक डॉ. रमा कार्यशाळेचा हेतु कार्यशाळेचे प्रास्ताविक ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे व त्यांना पांडे यांनी केले. कौशल्य वाढीसाठी प्रोत्साहित करणे हा विद्यार्थ्यांच्या हा असल्याचे सांगितले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये प्रमुख मार्गदर्शक प्रा. राम काटकर यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. जैविक आणि बाहय पर्यावरणीय घटक या दोन्हीच्या एकत्रित परिणामातून व्यक्तिमत्वाला आकार मिळत असतो. याच बरोबर कुटुंब व समाज व्यवस्था, मूल्य व्यवस्था, व्यक्तिचे आदर्श, सांस्कृतिक घटक आणि मित्र परिवार या सर्वांच्या प्रभावातून व्यक्तिमत्व घडते कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये डॉ. दिलीप मिसे, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई यांनी लेखन व संभाषण कौशल्य या विषयावर मार्गदर्शन केले. व्याकरण, वाक्य संरचना, विषय व्याप्ती, विवेचन, सराव, चिंतन आणि मांडणी या सर्व बाबतीत सुधारणा करत गेल्यास लेखन कौशल्य आणि संभाषण कौशल्य यामध्ये अमुलाग्र बदल होवू शकतो असे त्यांनी सांगितले कार्यशाळेच्या दुसाया दिवशी शुभांगी आणि सिता या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या बालक समुपदेशन या विषयावरील फ्लॅश कार्डचे अनावरण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. तिसाया सत्रामध्ये स्पर्धा परीक्षा या विषयावर डॉ. बिजयसिंग भाबरदोडे, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मनाची तयारी व शिस्त आणि अभ्यासातील सातत्य असेल तर यश निश्चितपणे मिळते असे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपली कुवत आणि परिस्थिती लक्षात घेवून करीअरचे नियोजन केले पाहिजे असे ते म्हणाले कार्यशाळेच्या चौथ्या सत्रामध्ये शालेय समुपदेशन या विषयावर मार्गदर्शन करताना साधन व्यक्ती डॉ. संध्या तळेकर, शालेय समुपदेशक, मनस्पंदन कोल्हापूर यांनी बालकांना समजून घेण्याची आवश्यकता वाढली आहे हे अनेक उदाहरणाद्वारे सांगितले पालकांना देखिल समुपदेशनाची आवश्यकता असते कारण ते पाल्याकडून खूप अपेक्षा ठेवतात. व या अपेक्षांच्या ओझ्यामुळे बालमन नैराश्यामध्ये जावू शकते. तसेच सामाजिक माध्यमांचा विपरीत परिणाम बालकांवर पडत आहे. प्रत्येक शाळेमध्ये प्रशिक्षित समुपदेशकाची आवश्यकता निर्माण झाली आहे समुपदेशन कसे करावे याचे प्रात्यक्षिक यावेळी घेण्यात आले कार्यशाळेची सुरूवात आकांक्षा कलंदर एम.एस.डब्ल्यू., प्रथम वर्ष आणि सिद्राम सोळंके एम.एसडब्ल्यू, द्वितीय वर्ष यांनी जनजागृतीपर गिताने केली. कार्यशाळेचे सुत्रसंचलन डॉ. किसन शिनगारे यांनी केले. तर आभार डॉ. हनुमंत साळुंके यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव हे होते. तर मानवलोकचे कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया यांची प्रमुख उपस्थिती होते. कार्यशाळेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते



# सैनिक रत्न पुरस्कार वितरण आणि सैनिक महामेळाव्यास उपस्थित राहा-नारायण अंकुशे


## पुण्यात छत्रपती संभाजी महाराज,बच्चू कडू,राजू शेट्टी,वामनराव चटप,शंकरराव धोंडगे यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या ७५ वर्षापासून देशातील आजी-माजी सैनिकांचा उपयोग फक्त मतापुरताच केला आहे. सैनिक आणि शहीद सैनिक परिवाराला त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे.

अशा विविध समस्याला वाचा फोडण्यासाठी आणि न्याय देण्यासाठीसैनिक महामेळावा आणि सैनिक रत्न पुरस्कार वितरण समारंभ आयोजन परिवर्तन महाशक्तीच्या घटक पक्ष भारतीय जवान किसान पार्टी ने दिनांक २१ ऑक्टोबर. २०२४ रोजी पुण्यातील बालगंधर्व नाट्यगृहात सकाळी ११ वाजता आयोजित केल्या असल्याची माहिती भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, या सैनिक रत्न पुरस्कार वितरण आणि सैनिक महामेळाव्याला छत्रपती संभाजी महाराज मा मंत्री बच्चू कडू,माजी खा राजू शेट्टी,माजी आ वामनराव चटप माजी आ शंकरराव धोंडगे या मान्यवरांच्या शुभ हस्ते वितरण होणार असून सैनिकाच्या समस्या आणि उपाययोजना यावर उपस्थित मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाची रूपरेषा ११ वाजता मान्यवराच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात. यानंतर उपस्थित मान्यवर यांच्या बरोबर चहा पाण्याचा कार्यक्रम. ११.३० हस्ते सैनिक रत्न पुरस्कार वितरण. १२ ते ०३ सैनिकांच्या समस्या विषयी उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन.०३ वाजता राष्ट्रगान गाऊन कार्यक्रमाची सांगता ०३-३० वाजता उपस्थित मान्यवरासह स्नेहभोजन अशी असुन दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी अकरा वाजता पुणे येथील बालगंधर्व नाट्यगृहात आजी-माजी सैनिक शहीद सैनिक परिवार असंघटित कामगार आणि माता भगिनींनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आव्हान आयोजक नारायण अंकुशे यांनी केले आहे



# भोसा जि.प.शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड



**मानवत । प्रतिनिधी**

आज जि.प.प्रा.शाळा भोसा येथे अनिता शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभा आयोजित केली. या पालक सभेतून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांची बिनविरोध निवडीने पुनर्गठन करण्यात आले.

अध्यक्ष म्हणून अनंतराव जाधव, तर उपाध्यक्ष म्हणून मुद्रिका जाधव आणि सदस्यांमध्ये प्रकाश जाधव, नितीन राऊत, प्रभाकर प्रधान, अर्चना गिरी, ज्योती भोसले, चांदणीबाई झोडपे, सुखदेव जाधव, गणेश जाधव- शिक्षण प्रेमी, दिपाली राऊत- ग्रामपंचायत प्रतिनिधी, पल्लवी पाटील- शिक्षक प्रतिनिधी

यांची बिनविरोध निवड करण्यात आली. समितीचे पदसिद्ध सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश बिडगर यांची निवड करण्यात आली.

पालक सभेच्या यशस्वीतेसाठी पंढरी सुर्वे, तुकाराम भालेराव व सर्व पालकांचे सहकार्य लाभले. या पालक सभेचे सूत्रसंचालन शंकर भिसे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापकांनी केले.

# जिल्हा परिषदेच्या दारुड्या मुख्याध्यापकांची विद्यार्थ्यांना मारहाण

## शाळेलाच बनवला दारुचा अड्डा; गंगापूर तालुक्यातील घटना

**गंगापूर । प्रा संजय तुपे**

जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाने दारूच्या नशेत शाळेतील ४ विद्यार्थ्यांना मारहाण केल्याच्या आरोप करीत महंमदपुर ग्रामस्थांनी मुख्याध्यापकाला निलंबित करण्याची मागणी केली असुन मुख्याध्यापकाचे रक्त तपासणीसाठी पाठवले आहे. या शिक्षकांनी शाळेलाच बनवला दारुचा आड्डाजिल्हा परिषद शाळेच्या दिपक सुलाने या मुख्याध्यापकाने दारूच्या नशेत शाळेतील ४ विद्यार्थ्यांना मारहाण ग्रामस्थांनी केल्यामुळे मुख्याध्यापकाला महंमदपुर शुक्रवारी निलंबित करण्याची मागणी केली. या संदर्भात गुन्हा दाखल करण्यासाठी महंमदपुर ग्रामस्थ शिल्लेगांव पोलिस स्टेशनला आले; मात्र, पोलिसांनी जिल्हा परिषद शाळेचा मुख्याध्यापक दिपक सुलाने याचे रक्त नमुने प्राथमिक आरोग्य केंद्र लासुरस्टेशन येथे दिले.



सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार महंमदपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दीपक सुलाने यांनी शुक्रवारी १८ आक्टोंबर रोजी दुपारी बारा वाजता शाळेतील विद्यार्थ्यांनींना दारु पिऊन मारहाण केली. त्यातील काहींच्या अंगावर वळ उठले असून घरी गेल्यानंतर विद्यार्थ्यांनी हा प्रकार आपल्या पालकांना सांगितल्यानंतर महंमदपुर ग्रामस्थ शाळेजवळ जमा झाले व त्यांनी केंद्रप्रमुख संजीव बोचरे यांना फोन करून माहिती दिली असता बोचरे बाहेर असल्याने त्यांनी विठ्ठल नरवडे मुख्याध्यापक यांना महंमदपुर येथे पाठवले असता ग्रामस्थांनी सुलानेला तातडीने निलंबित करण्याची मागणी करत गुन्हा दाखल करा अशी मागणी लावून धरल्याने नरवडे यांनी शिल्लेगांव पोलीसांना सांगुन रक्त नमुने तपासणीसाठी लासूर स्टेशन येथील प्राथमिकआरोग्य केंद्रात पाठवले परंतु सुलाने याला राजकीय अभय असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे सुत्रांकडून कळाले. या नंतर यांच्या संदर्भातील अहवाल गटविकास अधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना पाठवला जाईल, असे सांगितले; मात्र, या आश्वासनाने समाधान न झालेले ग्रामस्थ थेट शिल्लेगांव पोलिस स्टेशनला आले. व मुख्याध्यापक सुलाने यांच्याविरोधात बाल अत्याचार प्रतिबंधक कायदा व बाल शिक्षण हक्क कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती परंतु काही राजकीय हस्तक्षेप केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे बोलले जात आहे. महंमदपुर येथे जिल्हा परिषदचीमहंमदपुर येथे जिल्हा परिषदची पाचवी पर्यंत शाळा असून या शाळेत चार विद्यार्थ्यांसाठी तिन शिक्षक आहे यात दोन बेवडे शिक्षक असुन यांनी शाळेलाच दारुचा अड्डा बनवला आहे. अशा बेवड्या शिक्षकावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४

## परवाना धारकांना शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध

## शस्त्र जवळच्या पोलिस ठाण्यात जमा करावेत

**जालना । असलम कुरेशी**

भारत निवडणुक आयोगाच्या सुचनानुसार जालना जिल्ह्यामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ चा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यत, परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करण्यात येत आहेत. तरी असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.



भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलिस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी तसेच सराफा यांच्या व्यतिरिक्त तसेच मा. उच्च न्यायालयातील जुन्या रिट पिटीशन २००९/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन इतर सर्व परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास आदेशान्वये बंदी घालण्यात आली आहे. शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र जवळच्या पोलिस ठाण्यात जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एका आठवड्याचे आत संबधितांचे शस्त्रे परत करण्यात यावेत. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# मी विधानसभा निवडणूक लढणार आणि लढणारच,हे अंतिम सत्य-अनिलजगताप

## दि.२२ पासून अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला प्रारंभ; बीड मतदार संघातील कुटुंबियांच्या घेणार भेटी

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांच्या रनधुमाळी सुरु झाल्या आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना मोठया प्रमाणात पसंती देण्यात येत असून अनिलदादा यांच्या प्रचार दौऱ्याची उत्सुकता शिगेला पोहचली असल्याचे दिसून येत आहे. अनिलदादा जगताप यांचे समर्थक, सहकारी, कार्यकर्ते देखील मोठ्या उत्साहात प्रचार दौऱ्याचे नियोजन करून आहेत. अनेक वर्षांपासून जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या अनिलदादांना दादा तुम्ही आमदार व्हा, अशी आर्तहाक बीडकर देत आहेत. याच आर्तहाकेला ओ देऊन अनिलदादा जगताप महाराष्ट्राची धाकटी पांढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गडाचे दर्शन घेऊन आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ करत आहेत. येत्या मंगळवारी दि. २२ रोजी सकाळी श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेऊन अनिलदादा जगताप नवगण राजुरी सर्कलमधील सर्व गावांना भेटी देणार आहेत. यानंतर दुसऱ्या सत्रात बीड शहरातील काही प्रभागातील कुटुंबियांच्या भेटी घेणार आहेत. शिवसेना पक्ष जी भूमिका घ्यायची ती भूमिका घेईल. मात्र अनिलदादा यांच्या झंजावताला येणाऱ्या २२ तारखेपासून सुरुवात होत आहे. अनिलदादा जगताप यांनी यापूर्वीही अनेकदा पत्रकार परिषदेत मी विधानसभा निवडणूक लढवणारच आहे, अशी भूमिका स्पष्ट केली होती. पक्षाची भूमिका कोणतीही असो मात्र बीडकरांच्या हितासाठी आणि बीडच्या विकासाचा कायापालट करण्याकरिता कार्यकर्ते आणि जनतेच्या आग्रहास्तव निवडणूक लढणार आहेत व यासाठीचेच पाहिले पाऊल म्हणजे अनिलदादा जगताप आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ नारायण गडापासून करत आहेत. गेल्या सदोतीस वर्षांच्या राजकीय प्रवासात अनिलदादांनी शिवसेना आणि बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिलेले आहेत व आजही हेच विचार घेऊन अनिलदादा जगताप आपला प्रचार दौरा सुरु करत आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना सर्वोपरी पोषक वातावरण तयार झालेले आहे. आजवर विधानसभा निवडणुकीत अनेकांना संधी दिली. मात्र यावेळी अनिलदादांना संधी देऊ असा सुर बीड मतदार संघात चांगलाच उमठला आहे. अशा परिस्थितीत अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला होत असलेला प्रारंभ विजयाची नांदी ठरणारा असणार आहे.



### बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार; जनता आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी निवडणुक लढवणार- अनिलदादा जगताप

**वर्षानुवर्षे बीडची जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेलाच सुटणार आहे. काहीजण या जागेवर अतिक्रमण करत असले तरी ही जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेकडेच राहणार यात तिळमात्र शंका नाही. जनता आणि कार्यकर्ते यांच्या आग्रह आणि प्रबळ असणारी इच्छा लक्षात घेऊन मी निवडणूक कुठल्याही परिस्थितीत लढणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.**

# सामाजिक भान आणि परिस्थीची जान असलेला पोलीस अधिकारी–पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन

**केज । गौतम बचुटे**


अपघातात एका दोन महिन्याच्या चिमुकलीचा हात धडा पासून तुटून वेगळा झाला आणि तो तब्बल अठरा तासानंतर अपघातग्रस्त गाडी रस्त्या वरून हटविताना स्वतः पोलीस अधिकाऱ्यांच्या दृष्टीस पडला. त्या घटनेने पोलीस अधिकारी भावनिक झाले. रस्ता बांधणी करणारी कंपनी आणि त्यांचे अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला असल्याची जाणीव झाल्या नंतर केज पोलीस ठाण्यात कंपनीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र पुन्हा त्या टोल नाक्यावरील माती आणि सिमेंट काँक्रिटच्या अवशेषांच्यामुळे अपघात होवू नयेत म्हणून पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी सर्व अडथळे हटविले. तसेच त्या ठिकाणी रेडियम व रिफ्लेक्टर लावून घेतले. मात्र रस्त्यावर भरपूर प्रमाणात माती पडलेली असल्याने वाहने घसरून अपघात होवू नयेत; म्हणून अग्निशामक दलाच्या गाडी बोलावून स्वतः हातात पाण्याचा पाईपची वॉटर गन घेवून रस्ता धुवून स्वच्छ केला. त्यावेळी त्यांनी ते स्वतः एक पोलीस अधिकारी आहेत; याचा सर्व अभिनिवेश बाजूला ठेवला आणि अपघातातील त्या चिमुकलीचा आठवणीने भावनिक झाले.

या कृत्यामुळे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्यातील एक पोलीस अधिकारी नव्हे तर एक प्रेमळ व भावनिक माणूस आणि त्यांच्यातील माणुसकी व कर्तव्याची जाण असलेला अधिकारी याची चर्चा होत आहे.

**_असा झाला होता अपघात :–** संभाजी नगर येथे राहत असलेले जाधव कुटुंबात मुलगी झाल्याने ते लातूर येथून त्या दोन महिन्याच्या गोंडस चिमुरडीला व तिच्या आईसह संभाजी नगरकडे जात असताना दिम १७ ऑक्टोबर टोल नाक्यावर सुरक्षेची काळजी न घेता टाकलेल्या अडथळ्याला त्यांची कार धडकली. त्या गाडीने तीन चार पलट्या खाल्ल्या. अपघात गाडीतील आईच्या कुशीत असलेल्या चिमुकलीचा एक हात खांद्या पासून धडा वेगळा झाला आणि त्या कार मधील तिची आई, आजी, बहीण, चुलता आणि चालक हे जखमी झाले होते.

**अठरा तासा नंतर चिमुकलीचा तो तुटलेला हात सापडला :–** अपघात झाल्या होवून अठरा तासापेक्षा जास्त अवधी झाल्या नंतर तिचा इवलासा हात अपघात स्थळी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या दृष्टीस पडला आणि त्या घटनेने पोलीस अधिकारी हेलावून गेले.





## महाविकास आघाडीच गुजरातची ब्रँड म्बेसेडर

# ज्यांचा गृहमंत्रीच तुरुंगात गेला,तेच आता आरोप करताहेत–देवेंद्र फडणवीसांचा पलटवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महाविकास आघाडीतील नेते गुजरात राज्याचे ब्रँड म्बेसेडर असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. सध्या देशात महाराष्ट्र नंबर एकचे राज्य असून देखील महाविकास आघाडीचे नेते गुजरातचे गुणगान गात आहेत. या माध्यमातून ते महाराष्ट्राला कमी लेखत असल्याचा आरोप त्यांनी केला. इतकेच नाही तर गृहमंत्रालयावर होत असलेल्या आरोपांवर देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांचा गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेला, तेच आता आरोप करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



राज्यातील स्थगिती सरकार गेल्यानंतर आता राज्यात गतिशील सरकार आले असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. आमच्यासाठी निवडणुकीचा शंखानाद झाला आहे. मात्र विरोधकांसाठी ते ऐलान असल्याचा टोला देखील फडणवीस यांनी लगावला आहे. आम्ही परिवर्तन करणाऱ्या योजना आणल्या असल्याचा दावा देखील फडणवीस यांनी केला आहे.

शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेची योजना आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसा वीज उपलब्ध करून देणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. ही केवळ घोषणा नाही. तर याचे प्रत्यक्ष काम जमिनीवर सुरू केले असल्याचे देखील ते म्हणाले. साडेआठ रुपयांना पडणारी वीज आता तीन रुपयाला पडणार असल्याचे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे. यातून राज्य सरकारचा मोठ्या प्रमाणात पैसा देखील वाचणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.

राज्यातील कायदा व्यवस्थे संदर्भात देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राज्य सरकारने कोणतेही घटना घडल्यानंतर तात्काळ कारवाई केली असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. मात्र, ज्यांचे गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेले. ते आता राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असल्याचा खोचक टोला देखील त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या म्हणजेच उद्धव ठाकरे सरकारच्या काळात घडलेल्या अनेक गुन्हेगारी संदर्भातील घटनांचा उल्लेख केला. आता देखील काही घटना घडल्या आहेत. मात्र तात्काळ कारवाई केली गेली असल्याचा दावा त्यांनी केला.

# मानवत जिल्हा परिषद हायस्कूलचे खेळाडू चमकले जिल्हास्तरीय स्पर्धेत

**मानवत । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य कोणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी व जिल्हा देनीकॉइट असोसिएशन परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्रशाला मानवत येथे जिल्हास्तरीय शालेय रिंगटेनिस स्पर्धा उत्साहात संपन्न.



दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा परिषद प्रशाला मानवत च्या भव्य क्रीडांगणावर सदरील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील सतरा वर्षाखालील १९ वर्षाखालील मुले व मुली या विविध वयोगटात खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

उद्घाटन या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद प्रशाला मानवत च्या मुख्याध्यापिका श्रीमती छाया गायकवाड तर उद्घाटक म्हणून मानवत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी एम.टी चव्हाण उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हातेने कॉईट संघटनेचे सचिव कृष्णा कवडे मानवत केंद्राचे केंद्रप्रमुख उमाकांत हाडोळे जिल्हा परिषद प्रशालेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असद खॉन, उपाध्यक्षा अवचार मॅडम,आर्जुन वाघमार, संजय पत्रिके, मानवत तालुक्याचे क्रीडा संयोजक किशन भिसे, रेंगे सर, सुनील चौधरी, आनंद भिसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती तूपसमिंद्रे यांनी तर आभार प्रदर्शन शेख मुजीब यांनी केले.

एकूण २६ संघाने या स्पर्धेमध्ये आपले सहभाग नोंदवले.

या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्रशाला मानवत च्या खेळाडूंनी अतिशय चमकदारे कामगिरी करत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात जिल्ह्यामध्ये प्रथम पारितोषिक स्वतः वर्षे वयोगटात मुलांच्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक तसेच १९ वर्षे मुलांच्या गटात परभणी जिल्ह्यामध्ये प्रथम पारितोषिक मिळवले. त्याच पद्धतीने १४ वर्षाखालील मुलींच्या गटांमध्ये भितेपर्यंत सतरा वर्ष वयोगटांमध्ये मुलींच्या गटात तृतीय स्थान पटकावले

# चिमुकली वरील अत्याचार प्रकरणी भव्य आक्रोश मोर्चा

परभणी । रोहित झोल

सोनपेठ येथील चार वर्षांच्या चिमुरडीवरील अत्याचार प्रकरणी कहार भोई समाजाच्या वतीने दि. १५ ऑक्टोबर रोजी येथील तहसील कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. सोनपेठ येथील एका शाळेत चार वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार झाल्याची तक्रार मुलीच्या पालकांनी दि.७ रोजी सोनपेठ पोलीसात दिली होती . या तक्रारीची दखल घेऊन सोनपेठ पोलीसांनी एका संशयित आरोपींवर बालकांचा लैंगिक अत्याचार कायद्याखाली गुन्हा दाखल करून प्रकरणाचा तपास सुरू केला होता. सदरील तपासात पोलीस दिरंगाई करत असल्याची तक्रार मुलीच्या पालकांनी केली तसेच पोलीस संशयित आरोपीला अटक करत नसल्याने समाजात मोठा रोष निर्माण झाला होता. त्यामुळे कहार भोई समाजाच्या वतीने दि.१५ रोजी सोनपेठ तहसील कार्यालयावर भव्य अशा आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. संपुर्ण राज्यभरातुन मोठ्या संख्येने कहार भोई समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने सोनपेठ येथे हजर झाले होते. यात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी,सदरील प्रकरण जलदगती न्यायालयात चालवुन आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी,या प्रकरणात दुसऱ्या आरोपीला तात्काळ अटक करावी,शाळा प्रशासनावर कारवाई करावी,या प्रकरणात टाळाटाळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. पिडीतेला न्याय मिळवुन द्यावा या मागण्या मोर्चेकऱ्यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात करण्यात आल्या आहेत . या वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी दिलीप टिपरसे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड,दिपककुमार वाघमारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांच्या सह पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी मोठा बंदोबस्त ठेवला.मोर्चेकऱ्यांनी दिलेले निवेदन प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल यांनी स्विकारले. या मोर्चाला सोनपेठ तालुक्यातील माजी सैनिकांनी पाठींबा देऊन आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. राष्ट्रगीताने मोर्चाची सांगता करण्यात आली.



# वाचन प्रेरणा दिन साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानार्जनाची जिज्ञासा निर्माण करता येते –मुख्याध्यापक , सुभाषरावजी डख

**मानवत । प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन नेताजी सुभाष शिक्षण संस्थाच्या , नेताजी सुभाष विद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील साजरा करण्यात आला.

यानिमित्त विद्यालयाच्या वतीने वाचन प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनी मध्ये व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास या विषयांची पुस्तके वाचन करण्यास वाचन प्रकल्पा मध्ये ठेवण्यात आली होती.यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भाग घेतला या वेळी वाचन प्रकल्पाचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाषराव डख यांनी केले.उद्घाटन प्रसंगी मुख्याध्यापक सुभाषरावजी डख यांनी डॉ. कलाम हे एक अतुलनीय वाचक होते. त्यांनी वाचन केवळ ज्ञानार्जनच नव्हे तर आपल्या स्वप्नांना साकार करण्याचे साधन म्हणून वापरले. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करणे हे त्यांच्या या गुणवत्तेला उजळणी देणारे आहे.डॉ.



कलाम यांनी नेहमीच ज्ञानार्जनाचे महत्त्वावर भर दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानार्जनाची जिज्ञासा निर्माण करता येते.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय निर्माण करणे हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे. या प्रकारच्या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगता येते, असे विचार मांडले.कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते.या प्रसंगी बालाजी गोंटे अशोक पांढरे, एस. एन कच्छवे, सुरेखाताई चंदाले, संगीताताई थोरे , एकनाथ मुळे, अनिल चव्हाण, श्रीमती सोनालीताई माने आदींची या वेळी उपस्थिती होती.




**मानवत शहरातील रूद्रा चालक, मालक मित्र मंडळाच्या वतीने दूर्गात्सोवातील भाविक भक्तांना मिरवणूकी दरम्यान एक क्विंटल स्वादिष्ट खिचडीचे वाटप करण्यात आले. या वेळी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचासह चालक मालक उपस्थित होते.**

# ओसाका जपान जागतिक ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये आदिती दादाराव उजगरेने मिळवले सर्वोत्कृष्ट ट्रॉफी,पारितोषिक

**बीड । प्रतिनिधी**

बालकांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने, सुप्तगुणांचा विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. देशामध्ये जापनीज अबॅकसची जास्त शिकवण पद्धतीत प्रचलित असल्यामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास सातत्यपूर्ण अभ्यासातील क्षमता वाढत असते. अबॅकस आणि वैदिक मॅथ्स सारख्या पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये विद्यार्थ्यांमधील जन्मताच गुणांना संधी निर्माण करून दिली जाते. जागतिक स्तरावरील चेअरमन इंटरनॅशनल अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, मियाजमा अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, तैवान चेंबर्स ऑफ कॉमर्स, ओसाका चेंबर्स ऑफ कॉमर्स, पेन पॅसिफिक अबॅकस चीन तसेच अबॅकस अर्थमॅटिक अकॅडमी आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने व समन्वयाने २९ सप्टेंबर २०२४ च्या चॅम्पियनशिपमध्ये आदिती दादाराव उजगरेने प्रथमलेवल मध्ये भाग घेऊन ६५० गुण मिळवून जागतिक स्तरांमधील सर्व द्वितीय येऊन पहिल्या तीन मध्ये सर्वोत्कृष्ट क्रमांक मिळविला आहे. अबॅकस जागतिक स्पर्धेमध्ये जपान, चीन, साऊथ कोरिया, तैवान, भारत, श्रीलंका, सौदी अरेबिया, इराण, नॉर्वे, यु एस ए, मोरोक्को, सिंगापूर, मलेशिया, साऊथ आफ्रिका, कॅलिफोर्निया, नेपाळ, अशा एकूण १५ देशांमधील दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला असून सदरील स्पर्धा आणि बक्षीस वितरण निर्मल कुमार प्रतिष्ठान सोलापूर कार्यक्रम १३ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडला असून फेसबूक, ट्विटर, यूट्यूब, झूम अशा सर्व चॅनल्सवर प्रसारित करण्यात आलेला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अतिशय प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट सर्व द्वितीय रँक आदिती दादाराव उजगरेने अतिशय कठीण गणितीय प्रश्न सोडविण्याचा ऐतिहासिक विक्रम तिने केलेला आहे. आई–वडिलांच्या आणि शिक्षकांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे यश प्राप्त करता आलेले आहे असे आदिती उजगरेने सांगितले आहे. आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशनचे आयोजकने आदिती उजगरेने मिळवलेल्या यशाचे अभिनंदन उज्वल पांडा ओरिसा, जी एस एस श्रीनिवासन राव दिल्ली, राष्ट्रीय अबॅकस कार्याध्यक्ष श्री सतीश मुलगे तसेच अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून आदिती उजगरेचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. डिसेंबर २०२४ ओरियंट अबॅकस इंटरनॅशनल चॅम्पियनशिप यु एस ए होणाऱ्या इंटरनॅशनल अबॅकस चॅम्पियनशिप करीता आदिती उजगरेची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.



**“ विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांचा विकास करण्यासाठी अबॅकस पध्दत फार उपयुक्त असून शालेय स्तरातील अभ्यासाला मुळातून मदत करण्याची, विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताबद्दलची भीती दूर करण्यासाठी अबॅकस उपयुक्त आहे असे अबॅकस मास्टर ट्रेनर एस. ए. घोडके यांनी सांगितले.**

### एकताची बहारदार कोजागिरी काव्य मैफिल रंगली

# साहित्यिक अनंत कराड संमेलनाध्यक्ष तर बाळासाहेब कोठुळेंच्या हस्ते उद्घाटन



**शिरूर कासार । प्रतिनिधी**

छ.शाहू महाराज क्रीडा व योग केंद्र बालमटाकळी व एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमेच्या (दि.१६) रोजी रात्री स्व गोपीनाथ मुंडे सभागृह बालमटाकळी या ठिकाणी बहारदार काव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. एकताचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक मा.अनंत कराड यांच्या अध्यक्षतेखाली हे काव्य संमेलन संपन्न झाले या कार्यक्रमाचे उद्घाटन कविवर्य तथा पत्रकार बाळासाहेब कोठुळे यांनी केले. प्रास्ताविक करतांना संमेलनाचे आयोजक देविदास शिंदे यांनी वेदनेला फुंकर माणुसकीची हे ब्रीदवाक्य घेऊन संघटना काम करत असून साहित्यावर प्रेम करणारे अनेक मित्र एकता शी जोडले गेले आहेत असे सांगत मैफिलीस उपस्थितांचे ऋण व्यक्त केले. याप्रसंगी एकताचे सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, प्रदेश प्रवक्ता मल्हारी खेडकर, संस्थापक सदस्य व्यंगचित्रकार दिपक महाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

संमेलनाध्यक्ष म्हणून चारोळी सादर करताना अनंत कराड म्हणाले

**डुप्लिकेटच्या जमाना आहे**
**ओरिजनल ला किंमत नाही**
**नाठाळांच्या नादी लागायची.**
**शहाण्यांमध्ये हिंमत नाही.**

कराडांच्या या रचनेनंतर सभागृहात कोजागिरीच्या चांदण्यातही टाळ्यांचा पाऊस बरसला व प्रत्येकाला चिंब करून गेला. 'बाप' आणि 'केरसूनी' या त्यांच्या रचनाही रसिकांना अंतर्मुख करायला लावणाऱ्या ठरल्या. यानंतर उद्घाटक बाळासाहेब कोठुळे यांच्या

**पाऊस खूपच जास्त झालाय**
**तरीही कमळ सुकत चाललंय**
**काटे पहिल्यासारखी फिरत नाहीत**
**आता घड्याळही झुकत चाललंय**

या 'राजकारण' कवितेतील राजकीय कोपरखळ्यांनी सभागृहात हास्याचे फवारे उडाले. कवीवर्य भगवान फुंदे यांची 'भाकर वाटच पाहत राहिली' ही कविता उपस्थितांच्या डोळ्यात अंजन घालणारी ठरली तर शेतीमातीशी नाळ असणारे आत्मारामजी शेवाळे यांच्या 'प्रत्येकालाच आधाराचा हात पाहिजे' या सामाजिक वेदनेची जाणीव असणाऱ्या रचनेला उपस्थितांकडून टाळ्यांची दाद मिळाली. डॉ.अस्मिता बुधवंत यांनी मृत्यू या विषयावरील कवितेचे सादरीकरण करून जीवनाच्या वास्तवाला हात घातला तर शहादेव सुरासे यांनी

**भर दुपारी उन्हात बाभळीचा काटा**
**सल गेली काळजात नाही मांडला बोभाटा**

ही रचना पेश करत शेतकऱ्यांची वेदना उजागर केली. तद्नंतर अण्णासाहेब बोडके यांनी आपल्या पहाडी आवाजात

**घामातली जिंदगानी माय बापाने पहिली**
**घराच्या भल्यासाठी त्यांनी जिंदगी वाहिली**

ही 'मायबापाची जिंदगानी' रचना सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. यानंतर पूनम राऊत यांनी

**पण तरीही सखे कसं ग जमतं तुला**
**मनाला लगाम घालून पहाटे पहाटे**
**तू लागतेस अविरत कामाला**
**यंत्रासारखा वेग येतो आपोआप तुझ्या हाताला**

ही स्त्रियांच्या वेदनांवर भाष्य करणारी रचना सादर करत सर्वांना अंतर्मुख केले. सविता ढाकणे यांनी प्रयागतीर्थ काव्यसंग्रहातील आईची महती सांगणारी रचना सादर केली तसेच विद्या भडके यांनीही दर्जेदार कवितेचे सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली. अरुण तमानके यांनी 'तिरंग्याचा सन्मान' ही रचना सादर केली तर कुमारी प्रिती टेकाळे हिने 'विकासाचे आश्वासन रोज नवी होतात' ही रचना सादर करून प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारला. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जीवनावर आधारीत रचना डॉ.कृष्णा नागरे यांनी सादर करत संमेलनाचा माहोल बदलला. के.बी.शेख यांनी दमदार आवाजात

**कशास जगण्या चिंता उद्याची**
**मुक्त विहारी जाऊ**
**जशी पाखरे रानातले**
**तसेच होऊन राहू**

ही गेय रचना सादर केली. या रचनेला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यानंतर कुणाल पिंपळे यांच्या कोजागिरी चे महत्व सांगणाऱ्या बहारदार रचनेचे सादरीकरण झाले. बाल कवयित्री गीता संतोष नाटकर हिची स्त्री भ्रूणहत्या विषयावरील सामाजिक भान असणारी कविता रसिकांना प्रचंड भावली. या रंगतदार काव्य मैफलीचे बहारदार सूत्रसंचालन करणारे आदर्श शिक्षक कवीवर्य धर्मराज करपे यांच्या

**गुलामगिरीच्या उन्हात तू**
**वटवृक्षाची सावली झालीस**
**निपुत्रिक असूनही**
**लाखो लेकरांची माऊली झालीस**

या 'वटवृक्षाची सावली' या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावरील कवितेला भरभरून प्रतिसाद मिळाला. संमेलनाध्यक्ष अनंत कराड यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी बालमटाकळी व पंचक्रोशीतील अनेक साहित्यप्रेमी युवक, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांनी दुधाचा आनंद घेतला. स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहातील काव्य संमेलनाच्या मुख्य व्यासपीठासमोर चित्रकार विनायक सुरासे यांनी काढलेल्या अप्रतिम रांगोळीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

## सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी



**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात तिथीनुसार महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली.या वेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक उदय बोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील सहशिक्षिका शुभांगी पवार यांनी महर्षी वाल्मिकी यांनी त्या काळात केलेल्या कार्याची आठवण करून दिली. त्यांनी रामायण हे मोठे महाकाव्य रचले, आपल्या हातून झालेल्या पापातून मुक्त होण्यासाठी तपश्चर्येचा मार्ग अवलंबिला. त्यांनी भारतीय संस्कृती, परंपरा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केला. असे सांगितले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अविनाश दिघे यांनी केले तर आभार इकबाल शेख यांनी मानले. या कार्यक्रमास विदयार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

### बायपास मार्ग सुरू तरीही जड वाहने थेट शहरात

## पंढरपूरकरांचा जीव टांगणीला,बांधकाम विभागाने महिन्यापूर्वी दिलेल्या पत्राकडे पोलिसांचे दुर्लक्ष



**पंढरपूर । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन महिन्यापूर्वीच कोर्टी रोड - वाखरी बायपास मार्ग तयार असून अवजड वाहतूक बाह्यवळण मार्गे सुरु करण्यात यावी, असे लेखी पत्र दिल्यानंतरही पंढरपूर शहर पोलिसांच्या दूर्लक्षामुळे अवजड वाहतूक थेट शहराच्या मध्यवर्ती भागात येत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन,अपघाताच्या भीतीने पंढरपूर करांचा जीव टांगणीला लागलेला आहे. विशेष म्हणजे, सामान्य पंढरपूरकर या वाहतुकीविरोधात आपला रोष उघडपणे व्यक्त करीत असतानाही पंढरपूर शहर पोलीस आणि नगरपालिका प्रशासन या वाहतुकीला आळा घालण्याकडे कानाडोळा का करीत आहे, असा सवाल नागरिकाना पडलेला आहे.

पंढरपूर शहराचा विस्तार वाढत असून २० वर्षांपूर्वी जो लिंक रोड आणि बायपास मार्ग काढलेला होता तो मार्ग आता शहराच्या मध्यवर्ती भागात आलेला आहे. यापूर्वी या लिंक रोडवर अनेक अपघात होऊन नागरिकांचे बळी गेलेले आहेत. १२ ते १६ चाकी अवजड वाहने एकामागून एक पंढरपूरच्या मध्यवर्ती भागातून जात असतात. एवढेच नाही तर असे ट्रक थेट पंढरपूरच्या नव्या पेठेत आणि नगरपालिका, भादुले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंढरपूर अर्बन बॅन्क या परिसरात येत आहेत. त्यामुळे अगोदरच अरुंद असलेल्या मार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. अगोदरच पंढरपूर शहरातील रस्ते अरुंद आहेत, त्यातच रस्त्यावर व्यापाऱ्यांची आणि फेरीवाल्यांची अतिक्रमणे आहेत. नव्या पेठेत शेकडो भाजी विक्रेते रस्त्यावर बसून रास्ता व्यापून टाकतात, तरीही अवजड वाहने थेट गावात येतात. क्रांतिसिंह नाना पाटील चौक, जुना सोलापूर नाका, नागालँड चौक, प्रबोधनकार ठाकरे चौक या भागात वाहतुकीची कोंडी सतत होत असते. पोलीस प्रशासन या अवजड वाहतुकीकडे मात्र कानाडोळा करीत आहेत. त्यामुळे पंढरपूरकर नागरिकातून नाराजी व्यक्त होत आहे.वाहने बाहेर वळवणे अशक्य, व्यापाऱ्यांना सूचना करणार सार्वजनिक बांधकाम विभागास वाहतूक वळवण्याचे फलक लावणे, हाईट बॅरिकेड्स लावण्याची सूचना केलेली आहे, शिवाय पालखी महामार्गाच्या बायपासचे काम अपूर्ण आहे, ते कार्तिकी पूर्वी पूर्ण करण्याची सूचना हायवेला केलेली आहे. त्याशिवाय अवजड वाहतूक बाहेरून वळवता येणे अशक्य आहे. शहरातील अवजड वाहतुक होऊ नये. कार्तिकी नियोजन बैठकीत व्यापाऱ्यांना सूचना देण्यात येतील. - अर्जुन भोसले , उपविभागीय पोलिस अधिकारी

# महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या:खा.उदयनराजे भोसले यांचे आवाहन

**सातारा (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच दशकांमध्ये शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते होते. मात्र त्यांनी मराठा आरक्षणासह पश्चिम महाराष्ट्राच्या सिंचन योजना लटकत ठेवल्या. त्यांनी स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी इतरांना वंचित ठेवण्याचे काम केले. गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रात विकासाची जी फळे आहेत ती महायुती सरकारमुळे दिसत आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतही महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मतदार राजाने जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहन खासदार उदयनराजे भोसले यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने येथील लेक व्हयू हॉटेलमध्ये आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. यावेळी सातारा-जावळी या दोन तालुक्यातील बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी खासदार उदयनराजे भोसले बोलत होते. व्यासपीठावर महाराष्ट्राचे प्रभारी अजय जामवाल, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, सुनील काटकर, अविनाश कदम, भरत पाटील, सौरभ शिंदे, रंजना रावत, निशांत पाटील, अशोक मोने, माजी सभापती वसंतराव मानकुमरे, ज्ञानदेव रांजणे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



खा.उदयनराजे भोसले म्हणाले, काँग्रेसने गेल्या ५० वर्षांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या सत्ता विकेंद्रीकरणाला मूठमाती देऊन घराणेशाही सुरू ठेवली आहे. महाराष्ट्राच्या विकासाचे निर्णय बरीच वर्ष प्रलंबित राहिले होते. यशवंतरावांच्या यशवंत विचारांचा विसर काँग्रेसला पडला असून जातीय तेढ निर्माण करण्याचे पाप काँग्रेसने केले आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते असताना महाराष्ट्रातील सिंचनाचे रोजगाराचे शिवाय मराठा आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित राहिले. हे प्रश्न सोडवण्यासाठी पवार यांचा कोणी हात धरला होता का? त्यांच्यावर कोणाचे दडपण होतं का? असे बरेच प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. शिवरायांचा जनकल्याणाचा सर्व समावेशक विचार केंद्रात भाजपने आणि राज्यात महायुती सरकारने अमलात आणला आहे. विरोधकांनी महाराष्ट्राला भूलथापा देण्यात आलेले काही केले नाही. त्यामुळे त्यांनी आरोप करताना स्वतः पहिले आत्मपरीक्षण करावे, अशी घणाघाती टोलेबाजी उदयनराजे यांनी केली. महायुतीच्या जिल्ह्यातील उमेदवारांना आपण भरभरून आशीर्वाद द्यावेत. जेणेकरून महाराष्ट्राची गेल्या पाच वर्षापासून ची प्रगती यापुढेही अखंड सुरू राहील. याकरिता महायुतीचे उमेदवार कसे निवडून येतील याकडे लक्ष द्या, असे आवाहन उदयनराजे यांनी केले.आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले बोलताना म्हणाले, निवडणूका आल्या की विरोधक आमदारकीसाठी बाशिंग बांधून तयार असतात. मात्र गेल्या पाच वर्षात विकासाचा कोणताही ठोस कार्यक्रम त्यांनी राबवलेला नाही. सत्तेच्या प्रवाहात असतानाही काहींनी केवळ काही न करता आमदारकीसाठी आता दावा ठोकला आहे. मात्र गेल्या पाच वर्षात सातारा व जावली तालुक्यात महायुतीच्या माध्यमातून प्रचंड विकास कामे झाली आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077